# ‘ॲलोपॅथीमुळे आरोग्य सुविधा महागड्या’

**पुणे, ता. १५ :** ‘‘ॲलोपॅथीच्या सर्वदूर वापरामुळे आपल्याकडे आरोग्य सुविधा महागड्या झाल्या आहेत. भारतीय वैद्यकशास्त्रातील आयुर्वेद, युनानी, तसेच होमिओपॅथी त्यावर चांगला पर्याय ठरू शकतील,’’ असे मत ‘वनराई’चे अध्यक्ष मोहन धारिया यांनी सोमवारी व्यक्त केले.

डॉ. माधवी वैद्य लिखित ‘पुष्पौषधी’ या पुस्तकाच्या तीन भागांचे, तसेच त्यांच्या ई-आवृत्तीचे प्रकाशन धारिया यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. ‘माय विश्व’चे धनंजय दातार, नंदिनी पब्लिशिंगचे संतोष तांबोळी, निर्मला रानडे, डॉ. वैद्य या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

धारिया म्हणाले, ‘‘आरोग्य सुविधा महागल्यामुळे त्या सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. या परिस्थितीत पुष्पौषधींसारख्या होमिओपॅथिक उपचार पद्धती सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि अधिक परिणामकारकच ठरणार आहेत.’’

वैद्य म्हणाल्या, ‘‘पुष्पौषधींचा अभ्यास करताना असे लक्षात आले, की माणसापेक्षा निसर्ग नक्कीच सुंदर आहे. त्याच सुंदरतेच्या उपयुक्त गुणधर्मांवर आधारित या पुस्तकांच्या प्रकाशनामुळे आनंदच होत आहे.’’

रानडे, तांबोळी, दातार यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. आश्लेषा महाजन यांनी सूत्रसंचालन केले. महेंद्र मुंजाळ यांनी आभार मानले.




**‘पुष्पौषधी’ पुस्तकाचे मुखपृष्ठ.**